**Publication**: Apala Mahanagar **Edition:** Mumbai **Date:** 11th March, 2017

# इंडिया गेमिंग कॉनक्लेव्ह, गेमिंगच्या चाहत्यांसाठी दिल्लीत खास व्यासपीठ

● मुंबई । प्रतिनिधी

एआयजीएफ (ऑल इंडिया गेमिंग फेडरेशन) ही भारताच्या गेमिंग उद्योगातील सर्वोच्च संघटना १७ मार्च रोजी नवी दिल्लीत आपला वार्षिक आयपी कार्यक्रम 'इंडिया गेमिंग कॉनक्लेव्ह' लाँच करण्यासाठी सज्ज झाली आहे. हा अशाप्रकारचा पहिलाच कॉनक्लेव्ह असून त्यामुळे भारतात सध्या प्राथमिक पातळीवर असलेल्या गेमिंग उद्योगात समाविष्ट असणाऱ्या सर्व भागधारकांना विपुल संधी मिळतील.

इंडिया गेमिंग कॉनक्लेव्ह हा एआयजीएफचा आयपी आहे तसेच गेमिंग उद्योगातील भागधारकांसाठी गरजेच्या सर्व सोयी एकाच ठिकाणी देणारे व्यासपीठ आहे. या वार्षिक कार्यक्रमात भागधारकांना एकत्र आणून त्यांच्यातील संवादाद्वारे भारतात गेमिंग उद्योगाला कायदेशीर स्वरूप देण्याच्या दृष्टीने काम करणे हे आयजीसीचे ध्येय आहे. त्याशिवाय गेमिंगच्या सर्व पैलूंविषयी जागरूकता निर्माण करणे व प्रशिक्षित करणे हे इंडिया गेमिंग कॉनक्लेव्हचे ध्येय आहे.

**India Gaming Conclave will organize on 17th March**